Reg. No.A/587/ANR Dt. 18/07/1963
श्री शनैश्वर देवस्थान
शनि शिंगणापूर
पोस्ट : सोनई, ता.नेवासा, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) फोन : 02427-238093
Email : shanishingnapur@yahoo.com website : www.shanidev.com

दि. १३/०९/२०२६

## दरपत्रक सूचना

श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर करीता वाहनाची आवश्यकता असलेने वाहनचालकसह एक बोलेरे अथवा टाटा सुमो अथवा तत्सम वाहन **(वातानुकुलित)** या प्रकारचे वाहन भाडे तत्वावर घेणेकामी खाजगी संस्था/व्यक्ती यांचे कडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.

१. दरपत्रकाचे संक्षिप्त वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | दरपत्रक प्रसिध्दी दिनांक | दि.१४/०९/२०२६ |
| २ | दरपत्रक फॉर्म स्विकृती सुरु दिनांक | दि.१४/०९/२०२६ |
| ३ | पूर्व बैठक दिनांक, वेळ व ठिकाण | दि.१६/०९/२०२६ सकाळी ११.०० वा. प्रशासकीय कार्यालय, श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर यांचे दालन |
| ५ | दरपत्रक फॉर्म स्विकृती अंतिम दिनांक व वेळ | दि. १९/०९ /२०२६ दुपारी ३.०० वा. आवक-जावक विभाग, श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर |

२. निविदा फॉर्म मिळण्याचे ठिकाण www.shanidev.com/quotation या संकेतस्थळावर सदर दरपत्रकेची माहिती उपलब्ध आहे. दरपत्रक धारकांनी (विहीत नमुन्यांमध्येच) आपल्या अर्ज भरून समक्ष या कार्यालयास सादर करावेत. (पोस्टाद्वारे पाठविलेले अर्ज स्वीकारले जाणार नाही.)

३. दरपत्रक हि दोन लिफाफा पध्दतीने सादर करावी लागेल. लिफाफा 'अ' हा तांत्रिक माहितीचा लिफाफा असेल व लिफाफा 'ब' व्यापारी लिफाफा (दराचा) असेल.

५. दरपत्रकबाबतचे अंतिम अधिकार कार्यकारी अधिकारी, श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर यांचेकडे राखीव ठेवण्यात येत आहे.

Digitally signed by
Atul Pandit Chormare
Date: 14-09-2026
13:34:31

(अतुल चोरमारे)
कार्यकारी अधिकारी
श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर

Reg. No.A/587/ANR Dt. 18/07/1963
श्री शनैश्वर देवस्थान
शनि शिंगणापूर
पोस्ट : सोनई, ता.नेवासा, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) फोन : 02427-238093
Email : shanishingnapur@yahoo.com website : www.shanidev.com

## लिफाफा - अ (तांत्रिक लिफाफा)

श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर यांना वाहनाची आवश्यकता असलेने वाहनचालकसह एक बोलेरे अथवा टाटा सुमो अथवा तत्सम वाहन पुरविण्यासाठी अभिकर्त्याची नेमणूक करण्याकरीता सीलबंद दरपत्रक मध्ये दिलेल्या सुचनांप्रमाणे खालीलप्रमाणे माहिती देत आहे.

| अ.नं. | तपशील | होय / नाही |
|---|---|---|
| १ | दरपत्रक धारक/फर्म/संस्था चे नाव | |
| २ | पत्ता, दुरध्वनी क्रमांक | |
| ३ | पॅन, (छायांकीत प्रत जोडावी) | |
| ४ | दरपत्रकधारकाचा अनुभव असल्यास तपशील<br>शासकीय/निमशासकीय व केंद्र शासनाकडील (संबंधित खात्याचे अनुभव प्रमाणपत्र जोडावे.) | |
| ५ | वाहनाचे खालील प्रमाणे कागदपत्रे जोडावे -<br>१) वाहनाचे आर.सी. बुक क्रमांक (छायांकीत प्रत सादर करावी)<br>२) खरेदी दिनांक (०१ जानेवारी २०२१ नंतरचे) (छायांकीत प्रत जोडावी) | |
| ६ | वाहनाचा विमा, टॅक्स, फिटनेसचे अदयावत प्रमाणपत्र (छायांकीत प्रत जोडावी) | |
| ७ | परिवहन संवर्गात नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक (PERMIT)<br>(छायांकीत प्रत सादर करावी) | |
| ८ | वैध पीयुसी प्रमाणपत्र क्रमांक (छायांकीत प्रत जोडावी) | |
| ९ | वाहन, निवड झालेल्या फर्म / संस्थाच्या नावावर असणे बंधनकारक आहे. सोबत प्रमाणपत्र जोडावे. | |

दिनांक- / /२०२६
ठिकाण-

दरपत्रकधारकांची स्वाक्षरी

(नाव ................................................... )

Reg. No.A/587/ANR Dt. 18/07/1963
श्री शनैश्वर देवस्थान
शनि शिंगणापूर
पोस्ट : सोनई, ता.नेवासा, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) फोन : 02427–238093
Email : shanishingnapur@yahoo.com website : www.shanidev.com

## लिफाफा – ब (व्यापारी /दराबाबतचा लिफाफा)

१) दरपत्रक धारकांचे नाव ------------------------------------------------------------

२) दरपत्रक धारकांचा पत्ता ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

३) दरपत्रकेतील वाहनाचा प्रकार व दरपत्रक (प्रतिमाह)

| वाहनाचा प्रकार | दरमहा वाहनभाडे (वातानुकूलित)<br><br>चालकासह व सर्व मेंटेनन्स व टोलसह<br>तसेच सर्व करांसह रक्कम (रुपये/पैसे)<br><br>( इंधन विरहित ) |
|---|---|
| १ | २ |
| बोलेरो / टाटा सुमो / तत्सम वाहन | |

दरपत्रकधारकांची स्वाक्षरी

(नाव ................................................)

Reg. No.A/587/ANR Dt. 18/07/1963
श्री शनैश्वर देवस्थान
शनि शिंगणापूर
पोस्ट : सोनई, ता.नेवासा, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) फोन : 02427–238093
Email : shanishingnapur@yahoo.com website : www.shanidev.com

**(सदर प्रतिज्ञापत्र १०० रु. स्टॅम्प पेपरवर करावे)**

दिनांक / /२०२६

**प्रति,**
कार्यकारी अधिकारी,
श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर

मी याव्दारे श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर यांना वाहन भाडे तत्वावर उपलब्ध करून देण्याबाबत सोबत जोडल्याप्रमाणे व्यापारी व तांत्रीक लिफाफ्यात माझे दरपत्रक सादर करीत आहे. निविदेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य असून त्यास मी बांधील आहे.

मी याव्दारे प्रतिज्ञा करतो की मी सादर केलेली दरपत्रक मंजूर झाल्यास निविदेतील कामकाज मी उच्च गुणवत्तेने व दिलेल्या मुदतीत पार पाडेल तसेच मी निविदेव्दारे जे शासकीय काम देणेत येईल व संबंधित कागदपत्रे देण्यात येतील त्याबाबत पूर्णतः गुप्ततेची हमी घेत आहे. वाहन भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्याचा सेवा कालावधी हा श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर यांचे सूचनेनुसार राहील. निविदेचा अंतिम दर मला मान्य राहील. मला याबाबत पूर्ण कल्पना आहे की, माझी कामकाजात कोणत्याही प्रकारचा कसूर / दिरंगाई झाल्यास श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर प्रशासन निश्चित करतील अशा दंडास मी पात्र राहील. निविदेतील सर्व अटी व शर्ती पैकी काही अटी व शर्ती पूर्ण करण्यास मी पात्र नसल्याबाबत श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर प्रशासन यांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द कोणत्याही न्यायालयात आव्हान करणार नाही.

1) दरपत्रक ज्या संस्थेकडून दाखल करण्यात आल्या त्या संस्थेचे नाव
..........................................................................................................................
2) दरपत्रक ज्या संस्थेकडून दाखल करण्यात आल्या त्या संस्थेचा पत्ता
..........................................................................................................................
..........................................................................................................................
3) दरपत्रकधारकाचे संपूर्ण नाव व पत्ता
..........................................................................................................................
4) दुरध्वणी क्रमांक .......................... मोबाईल क्रमांक ..................................

**( दरपत्रक धारकाची सही )**

**साक्षीदार**

१) श्री. .................................................................................. रा. ........................................ सही

२) श्री. .................................................................................. रा. ........................................ सही

Reg. No.A/587/ANR Dt. 18/07/1963

श्री शनैश्वर देवस्थान
शनि शिंगणापूर

पोस्ट : सोनई, ता.नेवासा, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) फोन : 02427–238093
Email : shanishingnapur@yahoo.com website : www.shanidev.com

## अटी व शर्ती

१) दरपत्रक दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करुन सादर करावयाची आहे. (लिफाफा 'अ' तात्रिक लिफाफा व लिफाफा 'ब' दराचा लिफाफा)

२) लिफाफा अ मधील सर्व बाबींची पूर्तता केली असेल, तरच त्या दरपत्रकधारकाचा लिफाफा 'ब' उघडण्यात येईल.

३) दरपत्रकधारकाच्या वतीने निविदेवर स्वाक्षरी करण्यास, निविदे संबधिच्या बैठकांना उपस्थित राहण्यास किंवा तांत्रिक किंवा इतर माहिती पुरविण्यास एखादया व्यक्तीची नियुक्ती केली असल्यास त्यासंबधीचे दरपत्रकधारकाचे प्राधिकार पत्र (bidders power of attorney) देणे आवश्यक राहील.

४) दरपत्रकधारकाने दरपत्रक सादर करताना दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती, नियम या व्यतिरिक्त स्वतःची अट दरपत्रकामध्ये समाविष्ट करु नये, अशा पध्दतीच्या सशर्त दरपत्रक विचारात घेतल्या जाणार नाहीत.

५) दरपत्रक संदर्भात दरपत्रक प्रक्रियेदरम्यान किंवा दरपत्रक स्वीकृती नंतर कोणताही विवाद उत्पन्न झाल्यास श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर यांचा निर्णय अंतिम राहील.

६) दरपत्रकधारकाने दरपत्रक फॉर्म भरतांना अटी व शर्ती यांचे काळजीपूर्वक वाचन करुन तदनंतरच दरपत्रक फॉर्म भरावा. अपूर्ण माहिती असलेले दरपत्रक फॉर्म बाद करण्यात येईल.

७) दरपत्रक मंजूर करणे अथवा नाकारणे, आवश्यक वाटल्यास अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचा किंवा दरासंदर्भात तडजोड (Negotiation) करणेबाबतचे सर्व हक्क श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर प्रशासनाने राखून ठेवलेले आहेत.

८) बयाणा रक्कम किंवा सुरक्षा अनामत रक्कम यावर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

९) वाहनाचे दर चालकासह व सर्व मेंटेनन्स व टोलसह सादर करावेत.

१०) वाहनास लागणारे इंधन देवस्थानकडून पुरविले जाईल.

११) वाहनास लागणारे इंधन देवस्थानकडून पुरविण्यात येणार असल्याने प्रवास किती किलो मीटर करायचा यांचे बंधन देवस्थानवर नसेल.

१२) सदर दर सर्व देय करांसह नमूद करावेत.

१३) वाहनाचा वापर कोणत्याही शासकिय कामासाठी केला जाईल याची नोंद घ्यावी.

१४) वंगण, वाहन दुरुस्तीचा व टोलचा खर्च पुरवठादारांस करावा लागेल.

१५) वाहनाचा वापर जिल्हयातील ग्रामीण भागात, डोंगराळ भागात, शहरी भागात व बैठकीसाठी जिल्हयाबाहेर केला जाईल.

१६) वाहन जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर अथवा श्री शनैश्वर देवस्थान शिंगणापूर येथे रोज २४ तास उपलब्ध करुन द्यावे लागेल (सार्वजनिक सुट्टयासहित)

१७) पुरविण्यात येणारे वाहन दिनांक ०१ जानेवारी, २०२१ नंतर खरेदी केलेले असावे. व वाहनास परिवहन संवर्गात (Permit) वाहतुकीचा परवाना असणे आवश्यक राहील. तसेच वाहन स्वतःचे मालकीचे असणे आवश्यक राहील.

१८) पुरवलेले वाहन नादुरुस्त झाल्यास/किंवा इतर कोणत्याही कारणास्तव उपलब्ध न झाल्यास त्याऐवजी तात्काळ बदली वाहन देण्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठादारांची राहील.

१९) पुरवठादारांस वाहन रदद् करावयाचे असेल तर श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर प्रशासन यांचे कार्यालयास एक महिन्याची आगाऊ नोटीस द्यावी लागेल, अन्यथा वाहन पुरवठादाराकडून एक महिन्याचा भाडेपट्टा दंड स्वरुपात वसूल केला जाईल.

Reg. No.A/587/ANR Dt. 18/07/1963
श्री शनैश्वर देवस्थान
शनि शिंगणापूर
पोस्ट : सोनई, ता.नेवासा, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) फोन : 02427-238093
Email : shanishingnapur@yahoo.com website : www.shanidev.com

२०) यशस्वी दरपत्रक धारकांने पुरवठा केलेल्या वाहनावर कोणत्याही कारणास्तव दिवाणी अथवा फौजदारी दावा न्यायालयात दाखल नसावा.

२१) वाहन केवळ पुरवठादारांच्या अकार्यक्षमतेमुळे बंद राहिल्यास प्रतिदिनी पडणारे देय भाडे कपात करणेत येईल.

२२) निवड झालेल्या दरपत्रक धारकाने रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा आदेश दिलेच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत करुन दिला पाहिजे.

२३) करारनामा मुदतीच्या कालावधीत पुरविलेल्या वाहनाची विक्री किंवा हस्तांतरण करता येणार नाही.

२४) वाहन भाडे तत्वावर लावणेत आले नंतर वाहनास कोणताही अपघात झाल्यास होणारे सर्व प्रकारचे जीवीत व आर्थिक नुकसानीस वाहन मालक स्वतः जबाबदार राहील.

२५) वाहन मालकाने लॉगबुक अद्यावत करावे व ते प्रमाणित केल्यानंतर देयक सादर करावे त्याशिवाय मासिक भाडे अदा केले जाणार नाही.

२६) दरपत्रक धारकास भाडेतत्वावर वाहनाचे अदा करण्यात येणा-या देयकातून नियमानुसार टीडीएस व जीएसटी कपात करणेत येईल.

२७) कोणतीही दरपत्रक स्वीकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर प्रशासन यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

२८) यशस्वी अर्जधारकाने कामाचे आदेश प्राप्त होताच ७ दिवसाचे आत वाहन उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील वाहन उपलब्ध करुन न दिल्यास त्यांचे आदेश रद्द करणेत येईल.

२९) यशस्वी दरपत्रकधारकांने पुरविलेल्या वाहनाबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार कार्यकारी अधिकारी, श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर यांचेकडे राहील.

३०) करारनामा मुदतीदरम्यान वाहनांचे संपणारे टॅक्स व विमा अद्यावत करुन देण्याची जबाबदारी वाहन मालकाची राहील. सदर कागदपत्रे वेळोवेळी पूर्ण करण्यास वाहन मालकाने टाळाटाळ केल्यास होणा-या सर्व कायदेशीर नुकसानीस वाहन मालक सर्वस्वी जबाबदार राहील.

३१) यशस्वी पुरवठादाराने पुरवठा केलेल्या वाहनाची मूदत कार्यारंभ आदेश दिलेचे दिनांकापासून ११ महिने या कालावधीपर्यत राहील.

३२) सदर बाबतचे कराराची मुदत कधीही व कोणतेही कारण न दाखविता संपुष्टात आणणेचे किंवा मुदतवाढ देणेचे अधिकार श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर प्रशासन यांचेकडे राखून ठेवणेत येत आहेत.

३३) दरपत्रक उघडणेच्यावेळी मुळ कागदपत्रे संच सोबत आणावा.

३४) दरपत्रक मंजूरीनंतर L-१ दरपत्रक धारकास अनामत रक्कम रु.२०,०००/- **श्री शनैश्वर देवस्थान शनिशिंगणापूर** यांचे नावे धनाकर्ष / धनादेश जमा तत्काळ जमा करावा लागेल अनामत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

३५) वरील १ ते ३५ अटी पूर्ण करणा-या व कमी दरामध्ये वाहन उपलब्ध करुन देणा-या दरपत्रकधारकास प्राधान्य देणेत येईल.

**३६) दरपत्रक मंजूर झालेनंतर L-१ धारकास वाहन तत्काळ उपलब्ध करून द्यावे लागेल याची नोंद घ्यावी.**

**या व्यतिरिक्त इतर अटींचा समावेश करण्याचा अधिकार श्री शनैश्वर देवस्थान प्रशासनाने राखुन ठेवलेला आहे.**

मा.प्रशासक महोदय,
यांचे मान्यतेने

(अतुल चोरमारे)
कार्यकारी अधिकारी
श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था, शिंगणापूर